**दि.२९/०७/२०१९**

**प्रेसनोट**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत पोलीसांतर्फे विकासनगर, बालाजीनगर, घोरपडी भागातील भिन्न जाती धर्माचे मुलांकरीता क्रिकेट स्पर्धेचे आयोजन**

मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा पोलीस ठाणे हद्दीतील सर्व नागरीक,समाज, विद्यार्थी, नोकरदावर्ग यांचेशी समन्वये असणे आवश्यक आहे व नागरीकांना आपल्या सोबत ठेवायचे असले व समन्वय साधायचा असेल तर नागरीकांना सेबत घेवून वेगवेगळे कल्याणकारी योजना, स्पर्धा, चर्चासत्र, बैठका आयोजीत करुन कम्युनिटी पोलीसिंग उपक्रम राबविणेबाबत सुचित करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने मुंढवा पोलीस स्टेशन कडील सहा. पोलीस निरीक्षक, मनिष पाटील, पोलीस उप निरीक्षक भगवान गुरव व पोलीस हवालदार पिल्ले यांनी दि. २८/०७/२०१९ रोजी घोरपडी विकासनगर, बालाजीनगर परिसरातील विविध जाती धर्माचे मुलांच्या हाप पिच स्पर्धा मनपा योगा हॉल, श्रावस्तीनगर येथील मैदानामध्ये आयोजीत केल्या होत्या. सदर स्पर्धेमधील सहभागी संघ व कार्यकर्ते यांना कम्युनिटी पोलीसिंग उपक्रमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सदर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करुन पोलीस दलात कर्तव्य करीत असताना उपलब्ध अल्प वेळेमधूनही पोलीसांनी चांगली कामगिरी व विशेष कार्यक्रम राबविलेबद्दल सर्व संघानी व स्थानिक नागरीकांनी कौतुक करुन अभिनंदन केले.

तरी नमूद पोलीस अधिकारी यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**दि.२९/०७/२०१९**

**(संपतराव डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**